# PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com


दिनांक: २७.१२.२०१५

कृपया प्रसिद्धीसाठी

# पार्ले महोत्सव आयोजित स्मार्ट सिटी दौडमध्ये एक्साईजचा सुनील प्रसाद प्रथम

## सागर कासुर्डे ठरला पार्ले महोत्सव श्री २०१५चा मानकरी

मुंबई दि. २७ : स्मार्ट सिटीबाबत जागरूक करण्याच्या दृष्टीने १६ व्या पार्ले महोत्सवमध्ये आयोजित “स्मार्ट पार्ले दौड” मध्ये ३ हजार स्पर्धकांनी भाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या पार्लेकरांनी सामाजिक क्षेत्रातही पुढाकार घ्यावा व मुंबईला स्मार्ट सिटी करताना पार्ल्यात काय करता येईल याबाबत मार्गदर्शन करावे हा संदेश पोहचविण्यासाठी ही संकल्पना मांडण्यात आल्याचे प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी यांनी स्मार्ट सिटी दौडच्या उदघाटनप्रसंगी सांगितले.

पार्ले महोत्सवामध्ये किमान एकदा तरी यावे हा आम्हा सर्व पार्लेकरांचा प्रयत्न असतो आणि महोत्सवातील स्पर्धांमध्ये मुंबईच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या स्पर्धकांकडे पाहताना संपूर्ण पार्लेच एक भले मोठे व्यासपीठ झाले असल्यासारखे वाटते असे गौरवोद्गार जेठालाल म्हणून सुपरिचित अभिनेते दिलीप जोशी यांनी काढले. तर पुढील पिढ्यांना असेच व्यासपीठ मिळत रहावे यासाठी वर्षानुवर्षे पार्ले महोत्सवाचे आयोजन व्हावे अशी आशा अभिनेत्या इला भाटे यांनी व्यक्त केली.

१६ व्या पार्ले महोत्सवातील १० किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेत एक्साइजच्या सुनील प्रसाद यांनी ३१:२१:०५ अशी वेळ देत प्रथम क्रमांक पटकावला. स्मार्ट सिटी दौड मध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये ४ वर्षांच्या महेक परमार या चिमुकल्या मुलीने सर्वांचे लक्ष वेधले. तर शरीर सौष्ठव स्पर्धेत सागर कासुर्डे याने पार्ले महोत्सव श्री २०१५ हा किताबाचा मानकरी ठरला.

---

सदर प्रसिद्धीपत्रक गुरुचरण सिंह संधू, अध्यक्ष, आयोजन समिती यांनी प्रसिद्ध केले आहे.

# PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com


PARLE MAHOTSAV

PARLE MAHOTSAV